## नियमीत दिवाणी दावा क्र. ३२८ /२०१७ नि.८९ खालील आदेश

सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया सहिता आदेश ९ नियम २६ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त नेमणेसाठी दाखल केला आहे. सदर कामी वादी नं. २ यांनी नि.५५ प्रमाणे सरतपासाचे शपथपत्र दाखल कले आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादी क्रं. १ यांनी उलटतपास सुरु केला आहे. दरम्यानचे काळात वादी नं.२ यांना Hyertension, Hypoglycemia, Imbalance of Gait चा त्रास सुरु झाल्याने डॉक्टरांनी सदर वादींना बेडरेस्टचा सल्ला दिला आहे. सदर आजारापासून वादी नं. २ केंव्हा बरे होतील हे निश्चीत सांगता येत नाही. त्यामुळे वादी नं.२ यांना उलटतपासाठी कोर्टासमोर उपस्थित राहता येत नाही.

**०३.** वरील बाबींचा विचार करता वादीचा उर्वरित उलटतपास पूर्ण होणे आवश्यक आहे. म्हणून वादी यांनी स्थानिक न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती करुन उर्वरित उलटतपास पूर्ण करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे. सदर

कोर्ट कमिशन यांची नियुक्ती केलेस न्यायदान करणे मदत होणार आहे. सदर कोर्ट कमिशन नियुक्त न केलेस वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन वादी नं. २ यांचा उलटतपास पूर्ण करावा अशी विनंती केली आहे. आयुक्ताचा येणारा खर्च वादी अदा करणेस तयार आहेत.

०४. सदर कामी प्रतिवादी यांनी नि.क्रं. ९२ वर दाखल केला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांच्या सदरच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा, लबाडीचा व खोडसाळपणाचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांचा सरतपास नि.५५ वर दाखल केला असून काही उलटतपास घेणे बाकी आहे. वादी हे केवळ सदरचे काम प्रलंबित ठेवून प्रतिवादी यांना नाहक त्रास देणेचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. वादी यांनी त्यांच्या व्यवसायाशी सलग्न असलेल्या डॉक्टराकडून कथित वैद्यकीय प्रमाणपत्र हजर करुन त्या आधारे सदरचे काम चालविणेस जाणीव पूर्वक विलंब व्हावा या हेतूने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी दाखल वैद्यकीय

प्रमाणपत्र अवलोकन केले असता. डॉक्टरांनी वादी यांना बेडरेस्टचा सल्ला दिल्याचे दिसून येते. वादी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्रात नमूद केले आजारपणचा विचार करता वादींचे उर्वरीत उलटतपास पूर्ण होणेकरीता न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करुन त्यांचे मार्फत उर्वरित उलटतपास पूर्ण करणे न्यायाचे दृष्टीने उचीत होणार आहे. न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक केलेस प्रतिवादी यांना कोणतेही नुकसान होणार नाही व नियुक्ती न केलेस सदर काम प्रलंबित राहून अंतिम न्यायनिर्णय कामी विलंब होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर केल्यास अर्जाच्या अंतिम निर्णयास पोहोचण्यास मदत होणार आहे. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश.

०१. सदरचा अर्ज मंजूर करणेत आला आहे.

०२ न्यायालयीन आयुक्त म्हणून विधिज्ञ श्री. अभिजीत पाटील यांची नेमणूक करण्यात येते. त्यांनी कोर्ट कमिशन पत्राप्रमाणे वादी नं. २ यांचा वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांच्या समक्ष उर्वरीत उलटतपास पुर्ण करुन तसा अहवाल या न्यायालयाकडे पाठविणेत यावा.

०३. वादी यांनी न्यायालयीन आयुक्त यांचे शुल्क रु.२,०००/– न्यायालयात भरावे

०४. न्यायालयीन आयुक्तांनी अहवाल लवकरात लवकर न्यायालयात दाखल करण्याचा आहे.

०५. सदर केसचा पुरावा नोंदवितांना अभिलेख घेऊन जाण्यासाठी व सांभाळण्याची जबाबदारी श्री. एच.एन.जाधव, दिवाणी क.लिपीक यांची राहील.

Neha K.Nagargoje Digitally signed by Neha K.Nagargoje Date: 2023.04.21 17:34:31 +0530

(नेहा को.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
कळे–खेरीवडे.

कळे–खेरीवडे.
दि. २०/०४/२०२३.